# राम प्रहर

सोमवार, १५ ऑगस्ट २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक २९
www.ramprahar.com

◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड



## अंतरंग


ज्येष्ठ गुंतवणूकदार राकेश झुनझुनवाला यांचे निधन/२

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा सर्वत्र उत्साह/६

राष्ट्रीय लोकअदालतीला रायगडात उत्स्फूर्त प्रतिसाद/७







# राज्य मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर

**मुंबई : प्रतिनिधी**



राज्य मंत्रिमंडळातील नवनियुक्त मंत्र्यांचे खातेवाटप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी (दि. १४) जाहीर केले. राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी मंजुरी दिल्यानंतर हे खातेवाटप जाहीर करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सामान्य प्रशासन, नगरविकास, माहिती व तंत्रज्ञान, माहिती व जनसंपर्क, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक प्रकल्प), परिवहन, पणन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन, मृद व जलसंधारण, पर्यावरण व वातावरणीय बदल, अल्पसंख्याक व औकाफ तसेच इतर कोणत्याही मंत्र्यांना वाटप न केलेले विभाग असतील, तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृह, वित्त व नियोजन, विधी व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, गृहनिर्माण, ऊर्जा, राजशिष्टाचार ही खाती असणार आहेत.

याशिवाय राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धविकास, सुधीर मुनगंटीवार वने, सांस्कृतिक कार्य, व मत्स्य व्यवसाय, चंद्रकांत पाटील उच्च-तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग व संसदीय कार्य, डॉ. विजयकुमार गावित आदिवासी विकास, गिरीश महाजन ग्रामविकास व पंचायतराज, वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण, गुलाबराव पाटील पाणीपुरवठा व स्वच्छता, दादा भुसे बंदरे व खनिकर्म, संजय राठोड अन्न व औषध प्रशासन, सुरेश खाडे कामगार, संदीपान भुमरे रोजगार हमी योजना व फलोत्पादन, उदय सामंत उद्योग, प्रा. तानाजी सावंत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, रवींद्र चव्हाण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरीपुरवठा व ग्राहक संरक्षण, अब्दुल सत्तार कृषी, दीपक केसरकर शालेय शिक्षण व मराठी भाषा, अतुल सावे सहकार, इतर मागास व बहुजन कल्याण, शंभूराज देसाई राज्य उत्पादन शुल्क आणि मंगलप्रभात लोढा यांच्याकडे पर्यटन, कौशल्य विकास व उद्योजकता, महिला व बालविकास खाते देण्यात आले आहे.

## पनवेलमध्ये आज तिरंगा एकता सायकल रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या अमृत महोत्सवी (७५व्या) स्वातंत्र्य दिनानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि रोटरी क्लब ऑफ पनवेल इलिट यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १५) तिरंगा एकता सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

स्वातंत्र्य दिनी सकाळी ९.३० वा. तिरंगा रॅली पनवेल तालुका व शहर भाजप मध्यवर्ती कार्यालय येथून सुरू होणार असून ही सायकल रॅली पाच किमी अंतराची असणार आहे. या वेळी देशभक्तीपर गाण्यांचा कार्यक्रमसुद्धा होणार आहे. या रॅलीत सहभागी होणाऱ्या सायकलस्वारांस मोफत टी-शर्ट देण्यात येणार आहे. रॅलीत सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## मराठा समाजासाठी झटणारा
# लढवय्या नेता हरपला
## विनायक मेटे यांचे अपघाती निधन

**खोपोली, खालापूर, रसायनी, पनवेल : प्रतिनिधी**



मराठा समाजासाठी झटणारे लढवय्ये नेते, शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार विनायक मेटे यांचे रविवारी (दि. १४) पहाटे अपघाती निधन झाले. ते ५२ वर्षांचे होते. मेटे यांची कार मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर खालापूर हद्दीत माडप बोगद्याजवळ पुढे जाणाऱ्या अज्ञात वाहनाला धडकून हा अपघात झाला. दरम्यान, मेटेंच्या पार्थिवावर सोमवारी बीडमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मराठा आरक्षणासंदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईत आयोजित केलेल्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी विनायक मेटे बीडहून रात्रीच मुंबईकडे रवाना झाले होते. त्यांची इंडिव्हर कार (एमएच ०१-डीपी ६३६४) पहाटे एक्स्प्रेस वेवरील माडप बोगद्याजवळ आली असताना पुढे जाणाऱ्या अज्ञात वाहनाला या कारने जोरदार धडक दिली. या अपघातात मेटे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर त्यांना पनवेलजवळील कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या अपघातात मेटे यांचा कारचालक एकनाथ कदम बचावला आहे, मात्र सुरक्षारक्षक पोलीस हवालदार राम ढोबळे जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अपघाताची माहिती मिळताच भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष तथा स्थानिक आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रथम रुग्णालयात धाव घेतली. माध्यमांवर वृत्त वाऱ्यासारखे पसरताच मराठा आरक्षण कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात रुग्णालयाबाहेर गर्दी केली. त्याचबरोबर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, रवींद्र चव्हाण, विरोधी पक्षनेते अजित पवार, खासदार उदयनराजे भोसले, माजी खासदार संभाजीराजे भोसले, आमदार प्रवीण दरेकर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, विनोद साबळे आदी नेतेही रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी मेटे कुटुंबीयांचे सांत्वन केले. मुख्यमंत्र्यांनी या अपघाताच्या चौकशीचे आदेश दिले आहेत. **(पान २ वर..)**

## झंडा उँचा रहे हमारा...



(छाया : सुधीर नाझरे)

**मुरूड : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त टाक्याची वाडी येथील आदिवासी मुलांनीही राष्ट्रीय ध्वज डौलाने फडकविला.**




# भाजपसोबत निवडणुका लढविणार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाण्यातील कार्यक्रमात घोषणा

**ठाणे : प्रतिनिधी**

ठाण्यातील कला, क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक, वैद्यकीय, औद्योगिक आदी विविध क्षेत्रांतील दीडशेहून अधिक संस्थांनी एकत्रित येऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा सत्कार केला. डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात शनिवारी पार पडलेल्या या कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मुलाखत झाली. या वेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. आगामी सर्व निवडणूका भाजप-शिवसेना युतीत लढविणार असून त्याचबरोबर लवकरच अयोध्येला जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

मुंबई राज्यापासून कोणीच वेगळी करु शकत नाही. पण त्याचा काही जण राजकीय फायदा घेत आहेत. राम मंदिर उभारणे आणि ३७० कलम हटविणे, ही बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका होती. दोन्ही कामे झाली आहेत. तसेच, सर्वसामान्य कार्यकर्त्यांनी राज्याचा मुख्यमंत्री व्हायचे नाही का? जे सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेत त्यांनीच मुख्यमंत्री व्हायचे का? असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला. पातळी सोडून बोलण्याचा आणि दुसऱ्यांवर टीका करण्याचा माझा स्वभाव नाही असेही ते म्हणाले. याचबरोबर, आम्ही जो मार्ग पत्कारलेला आहे, तो बाळासाहेबांच्या भूमिकेचा मार्ग आहे. बाळासाहेबांची अनेक भाषणे आहेत. त्यात त्यांनी काँग्रेस आणि राष्ट्रवादी पक्षांसोबत कधी जायची वेळ आली तर दुकान बंद करेन असे म्हटले होते. आम्ही त्यांचे विचार पुढे नेतोय, मग आम्ही काय चुकीचे केले? असेही त्यांनी म्हटले. या दोन्ही पक्षांसोबत अद्यापही सत्तेत राहिलो असतो, तर शिवसेना पक्षाचे काय झाले असते, हे ज्योतिषाला विचारण्याची गरज नाही. आता घेतलेली भूमिका आम्ही अडीच वर्षांपूर्वीच घेतली पाहिजे होती. आम्ही विश्वासघात केला नाही असेही विधान त्यांनी केले.

पुढच्या अडीच वर्षात मुंबईतील सर्व रस्ते सिमेंट काँक्रीटचे करून शहर खड्डे मुक्त करणार आहे. ठाण्यातील तीन हात नाका भागात ग्रेड स्प्रेटर, अवजड वाहतुकीसाठी पर्यायी रस्ते आणि वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय सल्लागार नेमून वाहतूक आराखडा तयार करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे ठाणेकरांची वाहतूक कोंडीतून सुटका होईल असेही मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. दरम्यान, राजकीय पार्श्वभूमी नसतानाही एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री पदापर्यंत पोहचले. एखाद्या खेड्यातील व्यक्ती राज्याचा मुख्यमंत्री होतो, हेच भारतीय लोकशाहीचे बळ आहे. मुख्यमंत्री शिंदे हे कमी बोलणारे आहेत, पण ते काम करणारे संवेदनशील मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या हातून समाजातील शेवटच्या घटकाची कामे होवोत आणि सर्वच घटक त्यांच्या कार्याने सुखावतील असा विश्वास कोल्हापूरच्या कणेरी येथील सिद्धगिरी मठाचे मठाधिपती काडसिद्धेश्वर स्वामी यांनी कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला. तसेच, अनेक जण वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असतात. या कामाच्या तपश्चर्येतून सिद्धी प्राप्त होते. तेव्हा त्या व्यक्तीच्या परिश्रमाचा आणि समाजाप्रती असलेल्या योगदानाचा गौरव होतो. अशाच प्रकारे मुख्यमंत्री शिंदे यांचा इथे गौरव होत आहे असेही ते म्हणाले.

### स्वतःला मी कार्यकर्ता समजतो

*आम्ही राज्यसभा आणि विधान परीषदेला प्रामाणिकपणे मतदान केले, पण समोरच्यांनी नाही केले आणि चुकीचा माणूस पडला, असे सांगत त्यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला. आजचा झालेला सत्कार मी बाळासाहेब आणि आनंद दिघे यांना समर्पित करतो. आम्ही जे काही पाऊल उचलले आहे. त्याला नागरिकांनी केलेले स्वागत हेच उत्तर आहे. अन्याय होईल तिथे आवाज उठवा लढा अशी शिकवण बाळासाहेब आणि आनंद दिघे यांची होती. मी मुख्यमंत्री पदासाठी हे पाऊल उचलल नाही. मला आजही मी मुख्यमंत्री आहे असे वाटत नाही. मी स्वतःला कार्यकर्ता समजतो. समाजातील प्रत्येक घटक सुखी राहावा हीच इच्छा आहे, असेही ते म्हणाले.*



# मुंबई-पुणे महामार्गावर लवकरच 'इंटिलिजेंट मॅनेजमेंट ट्राफिक सिस्टीम'

## एमएसआरडीसीकडून कार्यादेश; वाहनचालकांवर राहणार नजर

**मुंबई : प्रतिनिधी**



मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महामार्गावर 'इंटेलिजेंट ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीम' (आयटीएमएस) लवकरच बसविण्यात येणार आहे. एमएसआरडीसीने यासंबंधीचे कार्यादेश संबंधित कंपनीला दिले आहेत. दरम्यान, महामार्गावर नऊ महिन्यांमध्ये यंत्रणा बसविण्यात येणार असून त्यानंतर महिन्याभर या यंत्रणेची चाचणी घेण्यात येणार आहे. एकूणच वर्षभरात अत्याधुनिक अशी आयटीएमएस यंत्रणा कार्यान्वित होऊन वाहतुकीला शिस्त लागेल, वाहनचालकांवर करडी नजर राहील आणि अपघात रोखले जातील असा विश्वास एमएसआरडीसीकडून व्यक्त करण्यात येत आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून ९४ किमी लांबीच्या या द्रुतगती मार्गावरून दररोज अंदाजे ६० हजार वाहने धावतात. या मार्गासाठी वेगमर्यादा निश्चित करण्यात आली असून कडक नियमही घालण्यात आले आहे. मात्र वाहनचालकांकडून वेगमर्यादा आणि नियमांचे पालन होत नाही. तसेच वाहतूक नियंत्रणासाठी सज्ज यंत्रणा अपुरी पडत आहे. त्यामुळे द्रुतगती मार्गावरील अपघातांचे प्रमाण वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर एमएसआरडीसीने येथे अत्याधुनिक अशी आयटीएमएस यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेतला आहे.

सार्वजनिक-खासगी सहभागातून हा प्रकल्प राबविण्यात येणार असून यासाठी अंदाजे १६० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. द्रुतगती मार्गावर वाहतूक शिस्त पाळली जावी, अपघात टाळवे, अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळावी, तसेच टोल वसुली जलद, अचूक, तसेच पारदर्शक पद्धतीने व्हावी यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणा बसविण्यात येणार आहे. संपूर्ण मार्गावर अत्याधुनिक सीसी टीव्ही कॅमेरे, ३९ ठिकाणी वाहनांचा वेग तपासणारी 'ॲवरेज स्पीड डिटेक्शन सिस्टीम', तर ३४ ठिकाणी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांचा शोध घेणारी 'लेन डिसीप्लेन व्हायलेशन डिटेक्शन सिस्टीम' बसविण्यात येणार आहे. दरम्यान प्रकल्पाचे कार्यादेश ३ ऑगस्ट रोजी देण्यात आल्याची माहिती 'एमएसआरडीसी'चे व्यवस्थापकीय संचालक राधेश्याम मोपलवार यांनी दिली. एका कंपनीला हे कंत्राट देण्यात आले असून आता अवघ्या काही दिवसांत प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणार आहे.



# रायगड पोलीस दलाची अमृत महोत्सवी दौड

## ३०० अधिकारी, कर्मचारी सहभागी

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातर्फे अमृत महोत्सवी दौडचे आयोजन करण्यात आले होते. यात पुरूष गटात अमोल कदम, महिला गटात समीना पटेत तर विशेष प्राविण्य गटात निलेश नाईक यांनी प्रथम क्रमांक पटकाविला.

अलिबाग येथील पोलीस अधिक्षक कार्यालयापासून या दौडला प्रारंभ झाला. अलिबाग शहरातील मारूती नाका, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, जोगळेकर नाका, चेंढरे बायपास, नागडोंगरी, बुरूमखाण, वरसोली, अलिबाग कुंभारवाडा मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, महावीर चौक, ब्राहमण आळीमार्गे पुन्हा पोलीस अधिक्षक कार्यालय येथे दौडची सांगता झाली. जवळपास ३०० पोलीस अधिकारी कर्मचारी या दौडमध्ये सहभागी झाले होते. अपर पोलीस अधिक्षक अतुल झेंडे, महसूल तहसीलदार सचिन शेजाळ यांनी ही १० किलोमीटरची दौड पूर्ण केली.

# भाजपतर्फे कर्जतमधील शिबिरात ५२ रुग्णांना श्रवणयंत्र वाटप

**कर्जत : प्रतिनिधी/बातमीदार**

तालुका भारतीय जनता पक्ष, युवक प्रतिष्ठान आणि संकल्प सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या शिबिरात श्रवणदोष असलेल्या रुग्णांना श्रावणयंत्र भेट देण्यात आले. तालुक्यातील ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील ५२ रुग्णांना यंत्राचे वाटप करण्यात आले.

शिबिरात ६० नागरिक यांनी तपासणीसाठी नोंद केली होती. डॉक्टरांनी प्रत्यक्ष तपासणी केल्यानंतर ५२ रुग्ण यांच्या कानात दोष आढळले होते आणि त्यामुळे त्यांना ऐकण्यात कमी येत होते. शेवटी श्रवणदोष असलेल्या ५२लोकांना ५०० रुपयात श्रवणयंत्र देण्यात आले. या शिबिरासाठी खेड्यापाड्याडून गरज रुग्ण आले होते. शेवटी त्या सर्व रुग्णांना अत्यल्प दरात श्रवण यंत्र देण्यात आली. भारतीय जनता पक्षाचे किसान मोर्चा प्रदेश सचिव सुनील गोगटे यांचे कार्यालयात आयोजित केलेल्या शिबिराला भाजप तालुका अध्यक्ष मंगेश म्हसकर, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वसंत भोईर, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, तालुका सरचिटणीस संजय कराळे, कर्जत शहर सरचिटणीस प्रकाश पालकर, तसेच शहर अध्यक्ष दिनेश सोळंकी, मारुती जगताप, समीर सोहोनी, प्रकाश पेमारे, दिनेश गणेगा राव, प्रशांत उगले, सर्वेश गोगटे, अभिनय खांगटे, मुनीर धानसे फैझान पटेल, अकबर कारंजीकर, भाजप महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस मृणाल खेडकर, महिला तालुका अध्यक्ष स्नेहा गोगटे, तसेच पुनम डेरवणकर आदी उपस्थित होते.



# खारघरमध्ये पदयात्रेला प्रतिसाद; तिरंगा फडकविण्यासाठी जनजागृती

**खारघर : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त १३ ते १५ ऑगस्टदरम्यान शासनाकडून हर घर तिरंगा अभियान देशात राबविले जात आहे. या कालावधीत प्रत्येक घरावर तिरंगा, फडकविण्यासाठी नागरिकामध्ये जनजागृती करावी यासाठी रविवारी (दि. १४) खारघरमध्ये एस क्लासेसच्या वतीने पदयात्रेचे आयोजन करण्यात आले.

या वेळी एस क्लासेसचे संचालक दीपक शिंदे यांनी सांगितले की, २०२२ हे वर्ष आपण आपल्या देशाच्या स्वातंत्र्याचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करीत आहोत. दीडशे वर्षे गुलामीत असलेल्या देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत आपण आपले योगदान देऊ शकलो नाही याची खंत आपल्या सर्वांना आहे, परंतु स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या प्रत्येक सुवर्णक्षणांचे साक्षीदार होण्याचे भाग्य आज आपल्याला लाभत आहे ही सौभाग्याची बाब आहे.



आयोजित पदयात्रेमध्ये सेक्टर १२मधील बियुडीपी सोसायटीमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भारत माता की जय, वंदे मातरम, जय जवान जय किसान, छत्रपती शिवाजी महाराज की जय या घोषणांनी परिसर दुमदुमला होता. या पदयात्रेत सुमारे ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

या पदयात्रेत माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, रामजी भाई बेरा, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, अध्यात्मिक सेलचे संयोजक नवलकुमार मोरे, प्रतिक सोसायटीचे अध्यक्ष सुरज शेलार, प्रदीप शेलार व दत्तात्रय राणे यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला तर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, उपाध्यक्ष दिलीप जाधव, माजी सैनिक संयोजक गझे सिंग शेरॉन, विपुल चौटलिया, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी, लखवीर सिंग सैनी यांनी भेट दिली.



**पनवेल : कोळी समाजाचे जिल्हाध्यक्ष विश्वनाथ कोळी यांच्या पत्नी सुनंदा कोळी यांचा प्रथम पुण्यस्मरण दिन गव्हाण येथे रविवारी झाला. भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे जाऊन आदरांजली वाहिली. या वेळी चेतन कोळी, विनोद कोळी, प्रमोद कोळी, जयवंत देशमुख आदी उपस्थित होते.**

पान १ वरून

# विनायक मेटे यांचे अपघाती निधन

**विनायक मेटे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सातत्याने संघर्ष करीत होते. त्यांनी अनेक आंदोलने केली. छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचेही ते अध्यक्ष होते. मला ते तीन-चार दिवसांपूर्वीदेखील भेटले होते. त्यांचा एकच ध्यास होता की आता तुम्ही दोघे आहात. त्यामुळे मराठा समाजाला न्याय मिळेल. आज आम्ही एक महत्त्वाची बैठक बोलावली होती, पण दुर्दैवाने त्यांचे दुःखद निधन झाले. राज्य सरकार त्यांच्या परिवारासोबत आहे.**

**-एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

**विनायक मेटे हे गरिबीतून वर येऊन स्वतःच्या जिवावर उभे राहिलेले नेतृत्व होते. मराठा आरक्षणाच्या मुद्द्याचा त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. मराठा आरक्षणासंदर्भातील त्यांचा मोठा अभ्यास होता. माझे ते अत्यंत जवळचे सहकारी होते. गेली ८-१० वर्षे आम्ही जवळून काम केले. अतिशय तळमळीचा नेता होता. त्यांचे निधन ही कधीही न भरून निघणारी पोकळी आहे. शिवसंग्राम परिवारासाठीही हा मोठा धक्का आहे. आम्ही त्यांच्या पूर्ण कुटुंबाच्या पाठीशी उभे आहोत.**

**-देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**



**शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी आमदार विनायक मेटे यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आणि धक्कादायक आहे. मराठा आरक्षणासहित मराठा समाजाचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी विनायकजींनी कायमच आग्रही भूमिका घेतली. स्वतःला समाजकार्यात झोकून देत तळागळातील सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी त्यांनी उभारलेला संघर्ष हा राजकीय क्षेत्रातील प्रत्येकालाच प्रेरणा देणारा आहे. मराठा समाजाच्या हक्कांसाठी लढणारे लोकाभिमुख नेतृत्व आज हरपले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांचे कुटुंबीय, आप्तस्वकीय आणि कार्यकर्त्यांना हे दुःख सहन करण्याची शक्ती देवो हीच प्रार्थना!**

**-आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष**

**मराठा समाजाचे लढवय्ये नेते व आरक्षणासाठी कायम आग्रही राहिलेले माजी आमदार विनायकजी मेटे यांच्या अपघाती निधनाची बातमी मनाला चटका लावणारी आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! त्यांच्या कुटुंबीयांना व मित्रपरिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!**

**-महेश बालदी, आमदार, उरण**

# प्रसिद्ध गुंतवणूकदार राकेश झुनझुनवाला यांचे निधन

**मुंबई : प्रतिनिधी**



प्रसिद्ध गुंतवणूकदार आणि शेअर मार्केटमधील बादशाह राकेश झुनझुनवाला यांचे मुंबईतील रुग्णालयात निधन झाले आहे. बिग बुल अशी त्यांची ओळख होती.

झुनझुनवाला गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. त्यांना रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला होता. मात्र, प्रकृती बिघडल्याने त्यांना मुंबईतील ब्रिज कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. राकेश झुनझुनवाला यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी निधन झाले आहे.

राकेश झुनझुनवाला यांची बिगबुल अशी ओळख होती. त्यासोबत अक्सा एअर या कंपनीचीदेखील त्यांनी स्थापना केली होती. स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्सचेदेखील ते प्रवर्तक होते. त्यांची नेटवर्थ ५ अब्ज अमेरिकन डॉलर इतकी होती. राकेश झुनझुनवाला यांची उद्योजक, गुंतवणूकदार आणि भारताचे वॉरेन बफे अशी ओळख होती. राकेश झुनझुनवाला यांचे वडील प्राप्तिकर विभागात अधिकारी म्हणून कार्यरत होते. राकेश झुनझुनवाला यांच्या पश्चात त्यांची पत्नी आणि तीन मुले आहेत. दरम्यान फोर्ब्ज मासिकाच्या आकडेवारीनुसार राकेश झुनझुनवाला हे भारतातील ३६ व्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती होते. गुंतवणूक आणि व्यापार या दोन्हीमध्ये यश मिळवलेले अशी त्यांची ओळख होती. झुनझुनवाला हे ले फटाफट दे फटाफट अशा पद्धतीनं ट्रेडिंग करत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्विट करुन राकेश झुनझुनवाला यांना आदरांजली वाहिली आहे.




पनवेल भाजपतर्फे

**जनहितार्थ**

माहितीसाठी

**पनवेल महानगरपालिका हद्दीत**
**सोमवार, दि. १५ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

**(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)**

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

**सर्व केंद्रांवर (वयोगट :** १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ७. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल
- ८. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

**ग्रामीण लसीकरण**

- पडघे उपकेंद्र
- खिडुकपाडा
- किरवली/आडीवली/धानसर
- कोपरा समाजमंदिर
- काळुंद्रे
- ओवे

**ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.**

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# दिघाटीत नवीन ग्रामपंचायत कार्यालय

## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्व. बाळासाहेब ठाकरे स्मृती योजनेंतर्गत दिघाटी येथे नवीन ग्रामपंचायत कार्यालय सुरू झाले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी (दि. १४) करण्यात आले.

या कार्यक्रमास भाजप केळवणे जि. प. अध्यक्ष मंगेश वाकडीकर, दिघाटी ग्रामपंचायतीचे सरपंच अमित पाटील, उपसरपंच रोहिदास शेडगे, ग्रामसेवक योगीराज मनवर, कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्याधर जोशी, दिघाटीचे माजी सरपंच दत्ता पाटील, केळवणे जि. प. युवा अध्यक्ष रोशन पाटील, जेष्ठ नेते चांगाजी पाटील, बळीराम ठाकूर, हिरामण ठाकूर, सामाजिक कार्यकर्ते गजानन पाटील, लक्ष्मण ठाकूर, भरत गावंड, राजाराम पाटील, सदस्य मनोहर पाटील, स्मिता ठाकूर, राजेश गावंड,वैशाली पाटील, हर्षदा पाटील, अक्षता म्हात्रे यांच्यासह इतर मान्यवर, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या लोकार्पणावेळी तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी, ज्यांनी खऱ्या अर्थाने ग्रामपंचायतीचा कारभार सांभाळला आहे आणि ज्यांच्या नेतृत्वाखाली ह्या ग्रामपंचायत कार्यालय सुरू केले आहे ते सरपंच अमित पाटील आणि रोहिदास शेडगे यांचे कौतुक करून अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



खारघर : सेक्टर १२ येथे पेप म्युझिक स्टोर अनिष तांबे यांनी सुरू केले आहे. नव्याने सुरू झालेल्या या दुकानाचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी उदघाटन करण्यात आले. या वेळी खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, चिटणीस विपूल चोटालिया, ज्येष्ठ नेते गिरीश गुप्ता, उत्तर भारतीय सहसंयोजक शैलेंद्र त्रिपाठी, पूर्व सैनिक सेल संयोजक गजेसिंह, बिल्डर शिधेन्दू पटेल आदी उपस्थित होते.




# उरण नगर परिषदेतर्फे स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत विविध कार्यक्रम





**उरण : वार्ताहर**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत उरण नगर परिषदेच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शनिवारी (दि. १३) नगर परिषदेच्या श्री. नारायण विष्णू धर्माधिकारी शाळेत गाथा स्वातंत्र्याची हा देश भक्तीपर गीतांचा कार्यक्रम झाला.

या वेळी नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, प्रशासक तथा मुख्याधिकारी संतोष माळी, प्रशासकीय अधिकारी अनिल जगधनी, प्रणाली संतोष माळी, भाजप उरण तालुकाध्यक्ष तथा नगरसेवक रवी भोईर, शहराध्यक्ष तथा नगरसेवक कौशिक शाह, नगरसेविका जानव्ही पंडीत, नगरसेवक राजेश ठाकूर, लेखा अधिकारी सुरेश पोसतांडेल, कर अधीक्षक संजय डापसे, कनिष्ठ अभियंता झुंबर माने, आरोग्य निरीक्षक हरेश तेजी, संजय पवार, सचिन नांदगावकर, प्रसाद मांडेलकर, नितेश पंडीत, महिला वर्ग, विद्यार्थी, पालक वर्ग, शिक्षक वर्ग, महिला बचत गट सदस्या व अध्यक्षा आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन नितेश पंडीत यांनी केले. रविवारी (दि. १४) चित्रकला, निबंध, वक्तृत्व आदी स्पर्धा घेण्यात आल्या. यात मुलांनी उत्कृष्ट चित्र काढून देशावरील प्रेम दाखविले.












## संपादकीय

# स्वातंत्र्य दिन चिरायू होवो!

देशभरात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा अभूतपूर्व उत्साह आहे. यंदा ७५वा स्वातंत्र्य दिन असल्याने त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हर घर तिरंगा अभियान राबविल्याने भारताचा राष्ट्रीय ध्वज सर्वत्र डौलाने फडकला आणि हा एक देशभक्तीचा सोहळा बनल्याचे सुखद चित्र पहावयास मिळाले.

**१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत स्वतंत्र झाला. देशाला ब्रिटिशांच्या जुलमी राजवटीतून मुक्त करण्यासाठी अनेक महापुरुषांनी बहूमोल योगदान दिले. यामध्ये कित्येकांना वीरमरणही आले. आज या सर्वांचे स्मरण करणे आवश्यक आहे. स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत देशाने केलेली वाटचाल थक्क करणारी आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली बदललेला नवा भारत तर प्रत्येक देशवासीयाची मान गर्वाने उंचावणारा आहे. विशेष म्हणजे विविध जाती-धर्मांचे लोक इथे गुण्यागोविंदाने राहतात. सण-उत्सव एकोप्याने साजरे करतात. ही विविधतेतील एकता म्हणजे जगाच्या पाठीवरील अनोखे वैशिष्ट्य असून आजही त्याचे अनेक देशांना नवल वाटते. ऐतिहासिक पार्श्वभूमी, नैसर्गिक संपदा, भौगोलिक विविधता असे बरेच काही असूनही जागतिक पातळीवर मात्र आपल्या देशाला तितकेसे महत्त्व मिळत नव्हते किंबहुना आपल्या देशाला कमी लेखले जात होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या रूपाने सक्षम व कणखर नेतृत्व लाभल्यानंतर चित्र बदलले. त्यानंतर जे काही घडले ते सर्वांनी पाहिले, अनुभवले आहे. आज आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशाचा डंका वाजत आहे. शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये भारतीयांनी केलेली प्रगती अभिमानास्पद आहे. अर्थात, अजूनही मोठा पल्ला गाठायचा आहे याची जाणीव पंतप्रधानांना आहे. विशाल दृष्टिकोन ठेवून ते व त्यांचे सहकारी कार्यरत आहेत. दोन वर्षांपूर्वी आलेल्या कोरोना महामारीने मोठ मोठे देश कोसळले. महासत्ता म्हटल्या जाणाऱ्या राष्ट्रांमध्ये अक्षरशः आणीबाणीजन्य परिस्थिती निर्माण झाली होती. भारतालाही या वैश्विक महामारीची झळ बसली, परंतु पंतप्रधान मोदींनी ज्या प्रकारे ही स्थिती हाताळली आणि देशवासीयांना तसेच इतर देशांच्या नागरिकांनादेखील लस उपलब्ध करून दिली त्याची जगभरातून वाखाणणी झाली. आज आपला देश एक वेगळ्या उंचीवर जाऊन पोहचला असून आगामी काळात एक शक्तिशाली राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या दिशेने प्रवास सुरू आहे. त्यामुळे काही देशविघातक शक्ती, समाजकंटक अधूनमधून विघ्न आणण्याचा प्रयत्न करतात. त्यांना भारताचे हित, विकास, प्रगती पाहवत नसल्याने ते अराजकता माजविण्याचा कट आखत असतात, पण देशाचे रक्षण करणारे वीर जवान, पोलीस यंत्रणा, दक्ष नागरिक असे डाव हाणून पाडतात. ज्या ज्या वेळी देशावर एखादे संकट, आपत्ती आली आहे त्या त्या वेळी देशवासीयांनी त्याचा धीराने सामना केल्याचा इतिहास आहे. तिरंगी ध्वजाची आण, बान व शान जपण्यासाठी देशप्रेमी नागरिक कधीही मागे हटणार नाही. हर घर तिरंगा अभियानाच्या निमित्ताने जाज्वल्य देशभक्तीचे व एकजुटीचे दर्शन घडले आहे. घरोघरी, शासकीय-निमशासकीय कार्यालये, दुकाने, विविध वास्तूंवर तिरंगा फडकला आणि त्या त्या ठिकाणच्या लोकांनी त्याला सलामी दिली. असा सोहळा अनुभवयाला मिळणे हेही भाग्यच म्हटले पाहिजे. भारताचा कर्तव्यदक्ष नागरिक म्हणून प्रत्येकाने देशाप्रति आपले योगदान द्यायला हवे. मग भारताची भरारी कुणीही रोखू शकत नाही. सर्वांना अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!**

# मतिमंद मुलांचे मायेने संगोपन

खबरबात

संतोष पेरणे

ध्येयाने झपाटलेले तरुण काय करतात? याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे दिलीप लहानू जेठे. सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले दिलीप हे आपल्या मंचर या गावातील शेतीवाडीकडे लक्ष घ्यायचे आणि वडिलोपार्जित किराणा मालाचे दुकान दिलीप जेठ हे लहानपणापासून चालवायचे? गावात वेगवेगळ्या प्रकारची माणसे किराणा दुकानात दिलीप जेठे यांच्या संपर्कात येत होती. त्या वेळी त्यांना सातत्याने दिव्यांग, अपंग, मूकबधीर आणि मतिमंद अशी मुले आजूबाजूला दिसायची आणि त्यांची शरीराची अवस्था बघून दिलीप जेठे यांना मन कायम हेलावत असायचे. त्या बालकांसाठी, मुलांसाठी काहीतरी करायला हवे असे जेठे यांना सातत्याने वाटायचे. त्यांच्या मनातील घालमेल त्यांनी त्यांच्या पत्नी यांच्या कानावर २००३मध्ये घातली आणि मतिमंद मुलांच्या संगोपन कार्याला सुरुवात झाली. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्तच्या पार्श्वभूमीवर जेठे करीत असलेले मतिमंद मुलांचे संगोपन नक्कीच दखल घेण्याजोगे आहे.

दिलीप लहाणु जेठे सर (रा. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे) येथे किराणा स्टोअर्स चालवायचे. समाजातील अपंग व्यक्ती त्यांच्या संपर्कात आल्या आणि त्यानंतर त्या अपंग व्यक्ती मधील विशेष करून मतिमंद कमी बुध्दयाक असलेली मुले यांच्या समस्या वेगळ्या असून त्यांच्यावर मायेचा हात फिरवता आला, तर ती मुले चांगले जीवन जगू शकतात असा विश्वास दिलीप जेठे यांच्यात निर्माण झाला. समाजाने पुर्णपणे पाठ फिरवलेली असलेल्या मतिमंद मुलांसाठी काहीतरी करावे यासाठी सतत त्यांच्या मनाची कालवाकालव सुरू होती. तेव्हा त्यांनी सह्याद्री आदिवासी विकास प्रतिष्ठान ही संस्था स्थापन केली. संस्था चालवायची म्हटले की, पैसे आलेच आणि त्यामुळे पैसे चालयावयाला घरातून काही मदत हवी आणि म्हणून कोणी काही मदत करील याची अपेक्षा न करता दिलीप जेठे यांनी आपल्या पत्नीला विश्वासात घेऊन किराणा दुकानातून पैसे या संस्थेमध्ये लावायचे ठरवले. अशा संस्थेत कोणताही नफा नसतो आणि त्यामुळे घरातील पैसे खर्च करावे लागत असतात, परिणामी कोणताही मित्र पैशाची मदत करायला किंवा संस्थेत सदस्य व्हायला तयार नव्हता, मात्र आपली मनीषा महत्वाची असल्याने दिलीप जेठे यांनी घरच्या मंडळींच्या पाठबळावर संस्थेचे काम सुरू केले. २००४ मध्ये घरचे आणि आपल्या जवळच्या नातेवाईकांना विश्वासात घेऊन सह्याद्री आदिवासी विकास प्रतिष्ठान ही संस्था स्थापन केली आणि त्यांचे मतिमंद मुलांसाठी काम करण्याचे स्वप्न साकार झाले, पण संस्था स्थापन करून काही फायदा नसतो तर मतिमंद मुलांमध्ये रमून त्यांची सुख दुःख समजून घ्यायला हवी अशी इच्छा असलेले दिलीप जेठे यांनी नंतर मंचर गावाच्या बाहेर पडण्याचा निर्णय घेतला.

संस्था नोंदणी झाल्यानंतर मतिमंद मुलांसाठी शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आणि दिलीप जेठे यांनी घट माथा उतरण्याचा निर्णय घेतला. त्याचे कारण कोकण हा प्रदेश तसा मुंबई तसेच अन्य महानगरे यांच्या जवळ असल्याने साहजिकच अधिक प्रमाणात काम करता येईल असे जेठे यांच्या लक्षात आले आणि त्यामुळे त्यांनी ठाणे जिल्ह्यातील सरळगाव येथे मतिमंद (विशेष) मुलांसाठी आपल्या संस्थेची पहिली शाळा सुरू केली. २००७ मध्ये मतिमंद मुलांची शाळा निवासी स्वरुपात सुरू केल्यानंतर आणि सामाजिक क्षेत्रातली मंडळी रस्त्यावर फिरणाऱ्या मतिमंद मुलांना आणून आपल्या संस्थेत सोडू लागल्याने संस्था गजबजू लागली. परिणामी संस्थेचे कामकाज मोठ्या प्रमाणात सुरू झाले, पण जेठे यांना आपल्या संस्थेचे स्वरूप भव्य करायचे होते आणि आपल्या कामाच्या कक्षा अधिक रुंद करायच्या होत्या. त्यामुळे त्यांनी आपल्या सह्याद्री आदिवासी विकास प्रतिष्ठानची शाळा सरळगाव मुरबाड येथून कर्जत येथे हलविली. कर्जत नगर परिषद हद्दीमधील भिसेगाव भागात भाडेतत्वावर निवासी शाळा सुरू करून मतीमंद मुलांसाठी गावापासून दूर राहून काम करणारे जेठे यांच्या मंचर गावातील कुटुंबाची जबाबदारी त्यांच्या पत्नी यांनी घेतली होती. किराणा दुकान चालवून घर चालवताना संस्थेला लागणारी आर्थिक गरज देखील त्या भागवत होत्या. या काळात संस्थेचे काम बघून समाजातील अनेक दाती मंडळी संस्थेशी जोडली गेली आणि संस्थेचा पसारा वाढत गेला. ४० मतिमंद विद्यार्थ्यांच्या गरजा भागवता येथील अशी शाळा उभी राहिली, पण संस्था स्वतःच्या मालकी जागेत नसल्याने मालकी जागेचा शोध सुरू झाला. त्यातून कर्जत तालुक्यातील चिंचवली येथे जमीन खरेदी केली आहे.






सामाजिक बांधिलकी म्हणून सुरू केलेल्या शाळांना शासनाचे अनुदान मिळत नाही हे पुन्हा एकदा सह्याद्री आदिवासी विकास प्रतिष्ठानच्या मतिमंद मुलांच्या शाळेला अनुदान मिळत नाही हे सिद्ध झाले होते, मात्र संस्था प्रमुख दिलीप जेठे यांनी हार मानली नाही आणि पाच वर्षे शाळा चालविली. २०१२ पर्यंत सुध्दा शाळेला सरकारने कोणत्याही प्रकारचे अनुदान मंजुर केले नाही. तेव्हा त्यांना शाळा चालवणे अवघड झाले. घरखर्च त्यानंतर शाळेचा खर्च कर्मचारी वर्ग हा सर्व खर्च त्यांना पेलवेनासा झाला, परंतु त्यांनी जिद्द सोडली नाही, त्यांनी स्वताःच्या मालकीची जमिन दुकान विकून टाकले आणि आजपर्यंत मतिमंद मुलांच्या उन्नतीकडे काम पुढे सुरू ठेवले. तेथे निवासी असलेली ४० मतिमंद मुले स्वताःच्या पायावर कशी उभी राहतील? हया साठी त्यांची धडपड सुरू आहे.मतिमंद मुलांची निवासी शाळा सुरु होऊन १६ वर्षे झाली, परंतु कोणत्याही प्रकारचे शासकीय मदत अथवा अनुदान मिळत नाही. पण त्यातही ते मागे हटले नाहीत आणि त्यांनी स्व्यांसेवी संस्था तसेच देणगीदार यांच्या मदतीने मतिमंद मुलांना त्यांच्या पायावर उभे करण्याची तारेवरची कसरत सुरूच ठेवली आहे. कोणत्याही प्रकारची सोंगे करता येतात, पण पैशाचे सोंग करता येत नाही आणि त्यामुळे आता दिलीप जेठे यांचे पुत्र चांगल्या पगाराची नोकरी करू लागल्याने त्यांच्या हातातून येणाऱ्या पैशाने देखील आर्थिक गणिते जुळविली जात आहेत.

चिंचवली येथे पाच गुंठे जमीन विकत घेऊन संस्थेने आपल हक्काचे घर मिळविले आहे. तेथे लहानशी इमारत बांधली असून तेथून ४० मतीमंद मुलांच्या निवासी शाळेचा प्रयोग सुरू झाला आहे. त्या ठिकाणी त्यांना आणखी एक बैठी इमारत बांधायची असून त्या एका छत्राखाली सर्व मुलांच्या राहण्याची व्यवस्था करायची आहे. रात्री अपरात्री ही मतिमंद मुले उठतात, काही झोपेत पडतात त्यावेळी त्यांची सर्व जबाबदारी पालक म्हणून दिलीप जेठे तसेच संस्थेमधील सर्व घेत असतात. त्यामुळे २० वर्षापर्यंत वयाची मुले शिक्षण घेवून कर्ती बनाण्याचा प्रयत्न करू पाहत आहेत. त्यांच्यासाठी धेयाने पछाडलेल्या दिलीप जेठे यांना आर्थिक ताकद समाजाने आणि शासनाने देण्याची गरज आहे. त्यामुळे या शाळेला शासनाचे अनुदान मिळण्याची मागणी होत आहे.



## बदलते तंत्रज्ञान



### स्मार्टफोन सतत चार्ज करावा लागू नये म्हणून 'या' टिप्स

जर तुम्ही नवा स्मार्टफोन खरेदी करणार असाल आणि बॅटरी लाईफची चिंता करीत असाल तर आता काळजी करू नका. साधारणपणे असे लक्षात आले आहे की, थोड्याशा निष्काळजीपणामुळे बॅटरी पहिल्यासारखी चालत नाही, असे लक्षात येते. लोक याकडे दुर्लक्ष करतात. जोवर फोन नवा असतो तोवर नीट चालते. जसा फोन जुना होतो, तशा बॅटरी प्रॉब्लेम सुरू होतात. त्यामुळे मोबाइल सारखा चार्ज करावा लागतो.

सध्याच्या आधुनिक युगात मोठ्या प्रमाणावर मोबाइलचा वापर करावा लागत आहे. अगदी लहान मुलांपासून ज्येष्ठापर्यंत सर्वांकडूनच मोबाइलचा वापर वाढला आहे. त्यामुळे जर तुम्हाला वाटत असेल बॅटरी खूप वेळ चालावी आणि सारखी चार्ज करण्याची गरज पडू नये तर इथे आम्ही काही सोप्या टिप्स देत आहोत. हे वापरून तुम्ही तुमच्या फोनची बॅटरा लाईफ वाढवू शकाल.

**स्मार्टफोनला करा रीबूट**

जर तुम्ही फोनला सारख रीबूट केलं याचा स्मार्टफोनवर चांगला परिणाम होतो. रीबूट केल्याने फोन आपल्या पूर्ण क्षमतेने चालतो आणि स्पीडपण चांगला राहतो. जर तुम्ही प्रत्येक आठवड्याला फोन रीबूट करत राहिलात तर तुम्हाला काही प्रॉब्लेम होणार नाही. पण जर खूप महिने रीबूट न करता फोन वापरत राहीलात तर बॅटरी हळूहळू काम करणे कमी करते.

**मोठ्या फाईल्स करा डिलीट**

जर तुम्ही फोनमधल्या हेवी फाईल्स वेळच्या वेळी डिलीट नाही केल्या तर त्याचा ताण फोनच्या प्रोसेसरवर येतो. आणि बॅटरीपण जास्त वापरली जाते. जेंव्हा बॅटरीचा वापर क्षमपेक्षा वाढतो तेंव्हा त्याची क्षमता कमी होते. त्यामुळे फोन पूर्ण कपॅसिटीने चालावा असे वाटत असेल तर हेवी फाईल्स वेळोवेळी काढणे आवश्यक आहे.

# अमृत महोत्सवी भारतीय स्वातंत्र्य दिन



१५ ऑगस्ट हा दिवस भारतीय इतिहासातील अत्यंत महत्वाचा दिवस आहे. या दिवशी १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त झाला. या वर्षी देशभरात भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात येत आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक शूरवीरांनी अथक परिश्रम घेतले. महात्मा गांधीजी, पंडित नेहरू, लोकमान्य टिळक, सरदार वल्लभभाई पटेल, सुभाषचंद्र बोस, राणी लक्ष्मीबाई अशा अनेक शूर स्वातंत्र्य वीरांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपले जीवन समर्पित केले. भगतसिंग सारखे थोर क्रांतिकारक हसत-हसत फासावर चढले. इंग्रजांच्या जुलमी अत्याचारास कंटाळून भारतीयांनी संघटित होऊन बंड पुकारले.

गांधीजींच्या अहिंसावादी विचारसारणीतून सविनय कायदेभंग करण्यात आला. भारत छोडो' आंदोलन छेडण्यात आले. अनेक चळवळी, उठाव, सत्याग्रह, आंदोलने यातून इंग्रजांना स्वातंत्र्य वीरांनी जेरीस आणले. अखेर शूर वीरांच्या त्यागातून तसेच बलिदानातून आपला भारत देश स्वतंत्र झाला.

१५ ऑगस्ट हा भारताचा एक महत्वाचा राष्ट्रीय सण आहे. या दिवशी दिल्लीच्या लाल किल्यावर पंतप्रधानाच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवला जातो. सर्व शाळा,महाविद्यालये व कार्यालयामध्ये ध्वजारोहण व ध्वजवंदन घेतले जाते. राष्ट्रगीत गायले जाते. देशभरात आनंदी व उत्साही वातावरण असते. दूरदर्शन तसेच सोशल मीडियाद्वारे देशभक्तीपर गाणी, देशभक्तीपर चित्रपट इ. प्रसारित केले जाते.

भारताच्या स्वातंत्र्य दिवसाचा ७५वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याचा आणि स्वातंत्र्यसैनिकांना श्रद्धांजली वाहण्याचा निर्णय घेतला. यानिमित्त देशभरात विविध कार्यक्रम करण्याचे ठरवले आहे. हा

**निमित्त**

महोत्सव १२ मार्च २०२२ रोजी सुरू झाला असून १५ ऑगस्ट २०२३ पर्यंत साजरा केला जाईल. भारत सरकारने हर घर तिरंगा (प्रत्येक घरात तिरंगा) ही मोहीम देखील सुरू केली आहे. यात प्रत्येक घरामध्ये २५ च्या अनुदान दराने २०३० इंच आकाराचा राष्ट्रध्वज वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.प्रत्येकाने आपल्या घरात अथवा कार्यालयात, संस्थेत १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या काळात भारताचा राष्ट्रध्वज फडकवत ठेवणे असे या अभियानाचे स्वरूप आहे.

भारत देश आपली मातृभूमी आहे. ती अनेक शूर वीरांच्या कर्तृत्वाने स्वतंत्र झाली आहे. हे प्रत्येक भारतीयाने सदैव स्मरणात ठेवून आपल्या देशाला सर्व क्षेत्रात प्रगतीपथावर नेण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त देशभर जल्लोष सुरू आहे. विविध कार्यक्रम, उपक्रम राबविण्यात येत आहे. भारत सरकारने हर घर तिरंगा (प्रत्येक घरात तिरंगा) ही मोहीमदेखील सुरू केली आहे. यात प्रत्येक घरामध्ये २५च्या अनुदान दराने २०X३० इंच आकाराचा राष्ट्रध्वज वितरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रत्येकाने आपल्या घरात अथवा कार्यालयात, संस्थेत १३ ते १५ ऑगस्ट २०२२ या काळात भारताचा राष्ट्रध्वज फडकवत ठेवणे असे या अभियानाचे स्वरूप आहे.

(छाया : सुधीर नाझरे)

क्लिक...क्लिक...!



मुरुड : भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त वाणदे येथील मा. रा. दिवेकर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तिरंगा रॅली काढली.

## आरोग्य प्रहर



### ऑफिसमध्येही करू शकता माईंड आणि स्पाईन रिलॅक्स

ऑफिसमध्ये तासनतास एकाच जागी, एकाच पोजीशनमध्ये बसल्यामुळे शरीरदुखी, शरीर आखडणे आणि मानसिक ताण वाढल्याचे वाटते काय? यामुळे आराम करणे आणि व्यवस्थित काम करणे कठीण होते. त्यामुळे तंदुरुस्त राहण्यासाठी सकाळी लवकर योगा किंवा व्यायाम करावा लागतो. बरेच लोक ते करतातही. मात्र अनेक जणांना वेळेअभावी इच्छा असूनही जास्त वेळ योग किंवा व्यायाम करता येत नाही.

ऑफिसमध्ये तुमच्या टेबल आणि खुर्चीसमोर बसूनही तुम्ही तुमच्या आखडलेल्या शरीराला आराम देऊ शकता. जर तुमच्या पाठ, हात आणि मानेवर ताण जाणवत असेल किंवा तासनतास बसल्यामुळे हाडांमध्ये दुखत असेल तर तुम्ही तुमची खुर्ची थोडी मागे खेचून शरीर थोडे स्ट्रेच केले पाहिजे.

**अशा प्रकारे मूव्ह करा पाठीचा कणा**

सर्वप्रथम आपल्या खुर्चीवर सरळ बसा आणि तळपाय जमिनीवर व्यवस्थित टेकवा.

आता तुमचे हात वरच्या दिशेने नेऊन इंटरलॉक करा आणि वरच्या दिशेला स्ट्रेच करा. थोडा वेळ याच पोजीशनमध्ये राहा.

आता इंटरलॉक केलेले हात समोरच्या दिशेला न्या आणि ते समोर स्ट्रेच करत पाठ गोलाकार करत मागच्या बाजूला थोडी खेचा.

आता दोन्ही हात मोकळे करा आणि मागच्या दिशेला पसरावा. मान वरच्या बाजूला स्ट्रेच करा आणि पाठ मागे खेचा.

आता दोन्ही तळहात डेस्कवर पुढे ठेवा, खाली जमिनीकडे पाहात डोके खाली न्या आणि पाठीचा कणा सरळ स्ट्रेच करा.

ही एक्सरसाइज दिवसातून एक किंवा दोनदा केल्याने तुमचे शरीर जास्त आखडणार नाही आणि आखडल्यास तुम्हाला त्या त्रासापासून आराम मिळेल.

# तीर्थक्षेत्र पालीत फुलला भक्तीमळा

## भाविकांनी घेतले बल्लाळेश्वराचे दर्शन; सलग सुट्ट्यांमुळे गर्दी





**सुधागड : प्रतिनिधी**

सलग आलेल्या चार दिवसांच्या सुट्ट्यांमुळे अष्टविनायक तीर्थक्षेत्र बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी रविवारी (ता.१४) हजारो भाविक पालीत आले होते. सकाळपासून दर्शनासाठी भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. मंदिर परिसराला जणूकाही यात्रेचे स्वरूप आले होते.

दर्शनासाठी रायगड जिल्हा, महाराष्ट्रातील विविध भागांसह मुंबई, ठाणे पुणे आदी शहरांतील आणि परराज्यातून भाविक व पर्यटक मोठ्या प्रमाणावर पालीत दाखल झाले होते. भाविकांची गर्दी असल्याने येथील दुकानदार व हॉटेल व्यवसायिकांचा धंदादेखील तेजीत होता. बल्लाळेश्वर मंदिर परिसरात गावठी भाज्या, फळे, कंदमुळे व रानमेवा घेऊन अनेक महिला विक्रेत्या बसल्या होत्या. देवळात येणारे भाविक आवर्जून ते खरेदी करत होते. त्यामुळे या विक्रेत्यांचा धंदा चांगला झाला.

मंदिर परिसरातील दुकाने व हॉटेल ग्राहकांनी गजबजले होते. परिसरातील हॉटेल, खेळण्याची व शोभिवंत वस्तुंची दुकाने, नारळ, हार, फुले व पापड मिरगुंड, कडधान्य विक्रेते, प्रसाद व पेढेवाले यांचा व्यवसाय चांगला झाला. मंदिर परिसरात मोठी वर्दळ पहायला मिळत होती. भाविकांच्या सोईसाठी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

दरम्यान, भाविकांची वाहने व अवजड वाहने यांची मोठ्या प्रमाणात रेलचेल होती. त्यामुळे अरुंद रस्त्यावरून समोरासमोरून वाहने आल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूककोंडी झाली होती. मात्र पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली नाक्या नाक्यावर पोलिसांचा चोख बंदोबस्त लावण्यात आला होता. तसेच देवस्थानचे सुरक्षा रक्षकदेखील देवस्थान परिसरातील वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न करत होते. भाविकांनी सुरळीत दर्शन घेतले.

**सलग सुट्ट्या आल्यामुळे मोठ्या प्रमाणात भाविक पालीत बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी आले होते. अनेकांनी चांगली खरेदी देखील केली. त्यामुळे विक्रेत्यांचा व्यवसाय चांगला झाला.**

–राहुल मराठे, व्यावसाईक, बल्लाळेश्वर मंदिर

**देवस्थान ट्रस्टने भाविकांसाठी विशेष खबरदारी घेत उपाययोजना केल्या आहेत. देवस्थानचे दोन भक्त निवास नाममात्र दरात भाविकांसाठी उपलब्ध केले आहेत. बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने भाविकांच्या सोयीसाठी शुद्ध थंड पाण्याची व सॅनिटायझरची व्यवस्था करण्यात आली आहे. रांगेत उभे राहण्यासाठी रेलींग व शेड उभारण्यात आली आहे. वाहने पार्क करण्यासाठी देवस्थानची दोन भव्य मोफत पार्किंगदेखील आहेत. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची कुठल्याही प्रकारची गैरसोय होत नाही.**

–जितेंद्र गद्रे, अध्यक्ष, बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्ट, पाली

# रायगडातील २२ धरणे पूर्ण भरली

**रोहे : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात गेला आठवडाभर जोरदार पाऊस पडत असल्याने धरण क्षेत्रातील पाणीसाठा वाढला असून पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत असलेल्या २८ धरणांपैकी २२ धरणे १०० टक्के भरली आहेत. यापैकी २१ धरणांतून पाण्याचा विसर्ग चालू आहे.

जिल्ह्यातील पाटबंधारे विभाग कोलाड अंतर्गत असलेली २२ धरणे पूर्ण भरली आहेत. यामध्ये फणसाड (ता. मुरूड), वावा (ता. तळा), सुतारवाडी (ता. रोहा), आंबेघर (ता. पेण), कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कवेळे, उन्हेरे (ता. सुधागड), कुडकी (ता. श्रीवर्धन), पाभरे, संदेरी (ता. म्हसळा), वरंध, कोथुर्डे (ता. महाड), साळोख, अवसरे (ता. कर्जत), भिलवले, कलोते मोकाशी, डोणवत (ता. खालापूर), मोरबे, बामणोली, उसरण (ता. पनवेल) या धरणांचा समावशे आहे.

याशिवाय महाड तालुक्यातील खिंडवाडी धरण क्षेत्रात ९९ टक्के, खैरे धरणात ८६ टक्के, पुनाडे (ता. उरण) धरणात ९३ टक्के, श्रीगाव (ता. अलिबाग) धरणात ८० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे, तर श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले धरणात ६९ टक्के व रानिवली धरणात सर्वांत कमी म्हणजेच ५४ टक्के पाणीसाठा आहे.

जिल्ह्यातील अंबा, सावित्री, उल्हास, कुंडलिका, पातळगंगा, गाढी या नद्या सध्या भरून वाहत आहेत. पाऊस असाच कायम राहिल्यास जिल्ह्यात मुबलक पाणीसाठा उपलब्ध होईल.



(छाया : महादेव सरसंबे)

# खोपोली स्मशानभूमीबाबत प्रशासनाने घेतली दखल



**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली स्मशानभूमीबाबत अखेर प्रशासनाकडून दखल घेण्यात आली आहे. खोपोली बाजारपेठेत असणाऱ्या स्मशानभूमीची दुरवस्था व डिझेल वाहिनी चार महिने बंद असल्याचे वृत्त दैनिक रामप्रहरमध्ये प्रसिद्ध होताच खोपोलीचे प्रशासन जागे झाले. स्मशानभूमीची साफसफाई व ओली लाकडे काढण्यासाठी कर्मचारी आपल्या वाहनासाठी दाखल झाले.

या कर्मचाऱ्यांनी साफसफाई करीत ओली लाकडे बाजूला काढून ती इतर ठिकाणी हलविण्याचे काम करण्यात आले. रविवार सुट्टी असूनही प्रशासनाने याची दखल घेत स्मशानभूमीकडे लक्ष देऊन ओल्या लाकडांच्या मोळ्या, भारे बाजूला केले, तर समोरच असणारे लाकडांचे लहान लहान तुकडे, कचरा गाडीत टाकून बाहेर नेला. दरम्यान, स्मशानभूमीतील डिझेल वाहिनी कधी सुरू होईल असा सवाल खोपोलीकर करीत आहेत.

# सीकेटी महाविद्यालयात नशामुक्तीविषयक जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजना व आजीवन अध्ययन विस्तार कक्ष आणि अमली पदार्थ विरोधी कक्ष, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि.१३) नशामुक्ती याविषयावर जनजागृती अभियानांतर्गत व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या वेळी अमली पदार्थ विरोधी दलाचे पोलीस उपनिरीक्षक विजय शिंगे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी प्रास्ताविक सादर केले. प्रमुख वक्ते विजय शिंगे यांनी नशामुक्ती विषयक जनजागरण करत अमली पदार्थांविषयी माहिती देताना युवक अमली पदार्थांच्या आहारी कसे जातात याविषयी भाष्य केले व युवकांना त्यांच्या प्रतिकूल प्रादुर्भावांचे वर्णन केले. तसेच विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले.



कला शाखेचे प्रमुख तथा आजीवन अध्ययन विस्तार कक्ष प्रो. डॉ. बी. एस. पाटील यांनी महाविद्यालयातील विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचा मागोवा घेतला. कार्यक्रमाची सांगता प्रा. हरिभाऊ खरात यांनी विद्यार्थ्यांना नशा विरोधी शपथ देवून केली. या वेळी अमली पदार्थ विरोधी कक्षाचे उपनिरीक्षक विजय शिंगे, खांदेश्वर पोलीस चौकीचे उपनिरीक्षक सर्जेराव कुंभवडे, पोलीस हवालदार रमेश उदगीर, रमेश तायडे, अर्जुन पवार, हेमांगी पाटील यासोबत महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एन. परकाळे, आजीवन अध्ययन विस्तार कक्षाचे प्रा. हरिभाऊ खरात, प्रा. कुशलकुमार कुराणी यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. आकाश पाटील तसेच आभार प्रा. हरिभाऊ खरात यांनी मानले. यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रो. डॉ. बी. एस. पाटील तथा प्रा. एस. एन. परकाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रायगडात विविध उपक्रम उत्साहात



(छाया : संजय करडे)

**मुरुड : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त केंद्र व राज्य शासनाच्या वतीने मार्गदर्शक सुचनेनुसार मुरुड पोलीस ठाण्याच्या वतीने हरघर तिरंगा, देशभक्तीपर शास्त्रीय संगीत कार्यक्रमाचे आयोजन मुरुड माळी समाज हॉल येथे करण्यात आले होते.

या वेळी मुरुड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक नितिन गवारे, संगितकार व गायक कला पाटील, गायक संजय रावळे, पोलीस शिपाई धनजंय पाटील, सहाय्यक पोलीस फौजदार दिपक राऊळ, स्वातंत्र्य सैनिक भगत, संजय गुंजाळ, पांडुरंग आरेकर, वासंती उमरोटकर, अजित कारभारी, राशीद फहीम, मोहन करंदेकर आदिंसह पोलीस पाटील, शांतता कमिटी, मोहल्ला कमिटी, होमगार्ड उपस्थित होते. दरम्यान, कला पाटील, संजय रावळे यांनी विविध देशभक्तीपर गिते सादर करत उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल सर्वांनी उभे राहून टाळ्यांच्या कडकडाटात सर्व पोलीस कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. या वेळी पोलीस निरीक्षक नितिन गवारे यांनी स्वातंत्र्य सैनिक भगत यांच्या पत्नीला सन्मानित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पांडुरंग आरेकर व आभार वासंती उमरोटकर यांनी मानले.

**जनतेच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती तेवत राहाव्यात, स्वातंत्र्य संग्रामातील सर्वांच्या आठवणी तसेच देशभक्तीची भावना जनमानसात कायम राहावी या उद्देशाने हे अभियान राबविण्यात येत आहे. स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव या उपक्रमात शहरातील सर्व नागरिकांना सहभागी होता यावे यासाठी शहरातील विविध ठिकाणी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.**

–नितिन गवारे, पोलीस निरीक्षक

**कर्जत : बातमीदार**

कर्जत तालुका पंचायत समितीच्या वतीने हर घर झेंडा अभियान अंतर्गत कर्जत शहरात तिरंगा रॅली काढण्यात आली. तिरंगा रॅलीनंतर सहभागी ४३ बचतगटांच्या ४५० महिला सदस्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.



(छाया : संतोष पेरणे)

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव अंतर्गत हर घर तिरंगा अभियानाबाबत कर्जत पंचायत समितीने पुढाकार घेवून जनजागृती अभियान रॅली काढली. कर्जत पंचायत समिती कार्यालय येथून कर्जत शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे पोहचली. त्याआधी कर्जत पंचायत समिती येथे स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते तिरंगा रॅलीला हिरवा झेंडा दाखविला. डॉ. आंबेडकर चौक येथे अभिवादन करून तिरंगा रॅली स्टेशन रस्त्याने मुख्य बाजारपेठ अशी छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे पोहचली. तेथे महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून रॅलीची सांगता करण्यात आली.

या रॅलीमध्ये कर्जत तालुक्यातील ४३ महिला स्वयंसहाय्यता बचत गट यांचा सहभाग होता. कार्यक्रम दरम्यान बचत गटाच्या ४५० महिला उपस्थित होत्या. त्यांची आरोग्य तपासणी करताना सर्वांचे हिमोग्लोबिन तपासण्यात आले. तसेच या महिला बचत गटांसाठी पाककला स्पर्धा आयोजित करण्यात आली.

या सर्व कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आमदार महेंद्र थोरवे, कर्जतचे प्रांत अधिकारी अजित नेराळे, गटविकास अधिकारी चंद्रकांत साबळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सी. के. मोरे, पंचायत समिती विस्तार अधिकारी उज्वला भोसले, तालुका अभियान व्यवस्थापक ललिता तेलवणे आदी उपस्थित होते.

**माणगाव : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त स्वातंत्र्यदिनी घरोघरी तिरंगा मोहीम राबविण्यात येत असून याबाबत जनजागृती म्हणून माणगाव नगरपंचायत हद्दीतील जुने माणगाव येथे वार्ड क्र.१७ चे माणगाव नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य रॅलीचे आयोजन रविवारी (दि.१४ )सकाळी करण्यात आले होते.

स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतानाच ७५ वर्षाच्या गौरवशाली परंपरेला समोर ठेवत प्रत्येकाच्या मनात देशाभिमान जागृत करणेसाठी स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव या अभियानांतर्गत हर घर तिरंगा उपक्रम देशभर राबविण्यात येत आहे. हे अभियान दि.१३ ते १५ ऑगस्ट दरम्यान यशस्वीपणे राबविण्यासाठी जुने माणगावकर सज्ज झाले आहेत. जुने माणगाव वार्ड क्र.१७ मधील ग्रामस्थांनी व राजिप मराठी शिक्षकांनी याबाबतीत जनजागृती करण्यासाठी रविवारी भव्य रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीसाठी जुने माणगावमधील ग्रामस्थ नगरसेवक दिनेश रातवडकर यांच्या निवासस्थानी एकत्रित आले होते. ही रॅली संगमेश्वर नगर, बाजारपेठ, मोहल्ला, अकबर परदेशी यांचे निवासस्थान पुढे बौद्धवाडी, कुंभार आळी, मस्जिद मोहल्ला येथून परत नगरसेवक रातवडकर यांच्या निवासस्थानी येऊन राष्ट्रगीताने रॅलीची सांगता करण्यात आली. या रॅलीत संगमेश्वरनगर, बाजारटेप मोहल्ला, बौद्धवाडी, कुंभार आळी, मस्जिद मोहल्ला येथील ग्रामस्थ तसेच वार्डातील राजिप मराठी शाळेचे विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



(छाया : सलीम शेख)

### कविता गर्जत आली

रागावली, रूसली, नाराज झाली
वहीत जाऊन गुपचूप बसली
स्वातंत्र्यलढ्याची हाक ऐकून
कविता माझी गर्जत आली

पारतंत्र्यात ती खितपत होती
स्वातंत्र्यप्रेमाने भारावली होती
देशासाठी प्राण देण्यास तयार होती
धैर्याने लढण्यासाठी ती वाट पाहत होती

वंदे मातरम्, भारतमाता की जय
असे म्हणून ती गर्जत होती
तिरंगा हातात घेऊन सिद्ध होती
स्वातंत्र्य मिळविण्यासाठी निघाली होती

भारतमातेची अवस्था पाहून ती गहिवरली
मरणाची भीती न बाळगता बाहेर पडली
प्रसंगी बलिदानास ती तयार झाली
भारतमाता की जय म्हणत ती गर्जत राहिली

भारत स्वतंत्र झाला म्हणून ती आनंदली
जननी जन्मभूमी तू हो महान भारती गायली
तिरंगा खांद्यावर घेऊन गर्जत राहिली
म्हणूनच माझी कविता मला प्यारी वाटली

–धनंजय गोंधळी, चिरनेर–उरण





(छाया : विनायक माडये)

**खोपोली :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून त्याचप्रमाणे घर घर तिरंगा या अभियानाच्या पार्श्वभूमीवर नगरपालिका हद्दीतील लवजी ग्रामस्थांतर्फे गावात स्वच्छता अभियान व रक्तदान शिबिर कार्यक्रम घेण्यात आले.

स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला अर्थात १४ ऑगस्ट रोजी लवजी ग्रामस्थांनी त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांनी गाव व परिसरात हातात झाडू, घमेले घेऊन स्वच्छता अभियान राबविले. यात ज्येष्ठ नागरिक व तरुण सामील झाले होते.

याचबरोबर वासुदेव बळवंत फडके या शाळा क्रमांक ८च्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गावातील ४३ जणांनी रक्तदान शिबिरात भाग घेतला. याशिवाय दिवसभरात रांगोळी व इतर स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. एकंदरीत या अभियानामुळे गावात उत्साहाचे वातावरण दिसून आले.

**रोहे : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त रोहा नगर परिषदेच्या वतीने रोहा अष्टमी शहरात विविध कार्यक्रम घेण्यात येत आहेत.

या अनुषंगाने रोहा नगर परिषदेचे गट क व गट ड मधील सर्व कर्मचाऱ्यांच्या स्पर्धांचे आयोजन करणेत आले आहे. यामध्ये वत्कृत्व स्पर्धा, संगीत खुर्ची, माझ्या स्वप्नातील नगर परिषद या विषयावर भाषण, माझ्या स्वप्नातील रोहा शहर या विषयावर भाषण, रस्सीखेच स्पर्धा, धावणे १०० मिटर,



कॅरम, बुध्दीबळ, रांगोळी स्पर्धा, डबा फोडी आदी कार्यक्रम, स्पर्धा घेण्यात येत आहेत.

## निवडक



### सैनिकी शाळेत ध्वजारोहण

**पनवेल :** हर घर तिरंगा या मोहिमेचा एक भाग म्हणून शनिवारी (दि. १३) सैनिकी शाळा विजय आर्मी स्कूल व ज्युनिअर कॉलेज चिखले येथे प्राचार्य एम. के. मराठे यांच्या उपस्थितीत शाळेतील शिक्षिका जे. जे. पवार यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी उपप्राचार्य पर्यवेक्षक सैनिक निदेशक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### आज आमदार जलतरण स्पर्धा

**उरण :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने महेश बालदी मित्र मंडळ, मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठान, हौशी जलतरण संघटना यांच्या सहकार्याने व आलोक ॲक्वा इंजिनिअर्स यांचा संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि. १५) सकाळी १० वाजता जिल्हास्तरीय आमदार जलतरण स्पर्धा नगर परिषदेच्या श्रीमान बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल विमला तलाव उरण येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी विशाल पाटेकर (९९२०४८४५४५), नगरसेवक धनंजय कडवे (९८३३७७१०५२), हितेश भोईर (९५९४२८६१९९), ओमकार कोळी (९३९४१७७५५८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आयोजकांनी सांगितले. नगराध्यक्ष सायली म्हात्रे, उपनगराध्यक्ष जयविन कोळी, भाजप तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शाह, नगरसेवक, नगरसेविका यांचे सहकार्य मिळणार आहे.

### कळंबोलीतील अंगणवाडीत झेंडेवाटप

**कळंबोली :** स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त पनवेल महानगरपालिका अंतर्गत घरोघरी तिरंगा अभियानानुसार कळंबोली सेक्टर ३ अंगणवाडी क्रमांक ६४ येथे कै. आमदार काकासाहेब थोरात इ वन टाईप असोसिएशन या ठिकाणी झेंडेवाटप करण्यात आले. अंगणवाडी मुले व पालक यांना सेविका मदतनीस यांच्यासमवेत स्त्री शक्ती फाऊंडेशनच्या अध्यक्ष विजया कदम यांच्या हस्ते झेंडेवाटप करण्यात आले. यासाठी पालिका प्रभाग अधिकारी सदाशिव कवटे यांच्या सहकार्याने कार्यक्रम पार पडला. या वेळी त्या सोसायटीचे अध्यक्ष शहाजी रुपणवर व या अंगणवाडीच्या सेविका शुभांगी निर्मळे हेही या वेळी उपस्थित होते.



# स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचा उत्साह

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात उपक्रम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या वतीने शनिवारी (दि.१३) स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत पेठ गाव येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या प्रांगणात विविध औषधी वनस्पतीचे वृक्षारोपण डीएलएलई व राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी केले.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. डि.एल.ई चे प्रमुख प्रा. महेश धायगुडे व एन.एस.एस प्रमुख प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा.रामकृष्ण टोपे, प्रा. सफिना मुकादम, प्रा.महादेव चव्हाण, डॉ.शुभांगी वास्के आदींनी सहकार्य केले.

वृक्षारोपणाचे आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, तसेच आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## खेड्यांचा इतिहास विद्यार्थ्यांसमोर सादर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातर्फे गुरूवारी (दि. ११) ओवेपेठ येथील लोकनेते रामशेठ ठाकूर न्यू. इंग्लिश स्कूलमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत खेड्याचा इतिहास हा कार्यक्रम राबवण्यात आला.

प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड व डी.एल.एल ई प्रमुख प्रा. महेश धायगुडे व राष्ट्रिय सेवा योजना प्रमुख प्रा. प्रथमेश ठाकूर तसेच प्रा. रामकृष्ण टोपे उपस्थित होते. या वेळी प्राचार्यांनी स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव विषयी माहिती दिली, तसेच प्रा. महेश धायगुडे यांनी शिरढोण खेड्याचा व पनवेल शहरांचा इतिहास सादर केला.





## कामोठ्यात गीत व नृत्य सादरीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पनवेल विधानसभा क्षेत्रात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव कार्यक्रम सुरू आहे. त्यानुसार कामोठे येथील नवकार अकॅडमीच्या संचालिका आरती रायसोनी व नवकार फार्माचे संचालक विजय रायसोनी यांच्या संकल्पनेतून कामोठे सेक्टर ३६ पोलीस स्टेशन चौक या ठिकाणी नवकार अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत व नृत्य सादर करत स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा केला.

या कार्यक्रमासाठी पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत तसेच कामोठे पोलीस स्टेशनचे निरीक्षक पाटील, राऊत, सुधीर पाटील आदी उपस्थित होते,

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी नवकार अकॅडमीमधील शिक्षिका दीपिका ठक्कर, मानसी कदम, प्रीती कोठारी, रवती जंगम, संध्या गायकवाड, राजश्री कदम, सुनंदा मंडळ व शिक्षक अक्षय सर यांनी विशेष मेहनत घेऊन हा कार्यक्रम साजरा केला. तसेच कामोठे पोलीस स्टेशनचे मनोज जाधव यांचेदेखील या कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

## सीकेटी विद्यालयात विविध कार्यक्रम; भाजप महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील सीकेटी विद्यालयाच्या प्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमाच्या वतीने देशाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

या वेळी पंचायत समिती सदस्य व भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष रत्नाताई घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, महिला सरचिटणीस लिना पाटील, इंग्रजी माध्यमिकचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिकचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, पालक प्रतिनिधी जयंत पाटील आदी उपस्थित होते.





कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन, नारळ वाढवून करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून रत्नप्रभा घरत यांनी आपल्या भाषणातून आपला स्वातंत्र्य लढा मौल्यवान आहे, तसेच स्वातंत्र्याची गाथा ही संघर्ष, धैर्य आणि शौयाची असल्याचे सांगितले.

मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी अमृतमहोत्सवी वर्ष हा ऐतिहासिक टप्पा असल्याचे सांगितले. ब्रिटीशांच्या वर्चस्वातून मुक्त झाल्यानंतर नव्या भारताच्या उभारणीचा रस्ता अधिक प्रशस्त करावयाचा असल्याचे आहे, तसेच हे वर्ष भारतीयांसाठी अनेकार्थी महत्त्वाचे असल्याचे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

स्नेहल कडव यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शबुना शेट्टी व अनघा भोसले यांनी केले. या वेळी विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण प्रमुख पाहुण्याच्या हस्ते करण्यात आले. प्रियंका नायर यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली.

# पनवेल, उरण परिसरात शानदार ध्वजारोहण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त १३ ऑगस्टपासून सुरू झालेल्या हर घर तिरंगा अभियानांतर्गत रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत जुनिअर कॉलेज आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण मात्रे विद्यालय व टी. एन. घरत जुनियर कॉलेज ऑफ सायन्स या दोन्ही शाखांच्या संयुक्त विद्यमाने विद्यालयाच्या प्रांगणात सलग दुसऱ्या दिवशी ध्वजारोहण समारंभ झाला. मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रणिता गोळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

या वेळी गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, पर्यवेक्षक दीपक भर्णुके, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, संस्थेच्या च्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, जुनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, दोन्ही शाखांचे शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल : गव्हाण ग्रामपंचायत कार्यालय येथे स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरा करण्यात आला. या वेळी सरपंच माई भोईर, सदस्य योगिता भगत, कामिनी कोळी, सुनीता घरत, ग्रामसेवक विजय राठोड, पांडुशेठ घरत, विश्वनाथ कोळी, अश्विनी ठाकूर तसेच ग्रामपंचायत कर्मचारी, शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.**

**पनवेल : हर घर तिरंगा अभियानांतर्गत गव्हाण ग्रामपंचायत कार्यालयावर तिरंग्याच्या रंगांनुसार रोषणाई करण्यात आली आहे.**



## शालांत परीक्षेत प्रथम आलेल्या विद्यार्थिनींच्या हस्ते ध्वजारोहण



**उरण : रामप्रहर वृत्त**

महात्मा गांधी विद्यालय, दिघोडे येथे स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हर घर तिरंगा ह्या अभियानांतर्गत शासनाच्या आदेशानुसार रविवारी (दि. १४) विद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. दहावीमध्ये प्रथम आलेली सुहानी श्रावण घरत व बारावीमध्ये प्रथम आलेली मानसी कृष्णा पाटील या विद्यार्थिनींना ध्वजारोहणाचा मान देण्यात आला.

या वेळी विद्यालयाचे प्राचार्य एन. एन. नाईक, ज्येष्ठ शिक्षक पिंपरे, फल्ले व इतर शिक्षक उपस्थित होते. शिवभत, सौ. प्रतिक्षा व प्रा. श्री. म्हात्रे यांनी राष्ट्रभक्तिपर गीते गायली.

द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनतर्फे आयोजित मॅरेथॉन स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात व तीन किमी अंतर शर्यतीत तनिष्का गंगाराम थळी हिने द्वितीय क्रमांक पटकाविला. याबद्दल तिचा या वेळी सत्कार करण्यात आला.

**खांदा कॉलनी : भागूबाई चांगू ठाकूर विधी महाविद्यालयात स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी प्रभारी प्राचार्य धनश्री कदम, प्रा. रवनिश बेक्टोर, संघप्रिया, ममता गोस्वामी, तसेच प्राध्यापक हिमांशु मोरे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण झाले.**












# राष्ट्रीय लोकअदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद

## एकूण १७ हजार ५१७ प्रकरणे निकाली

**अलिबाग : प्रतिनिधी**

न्यायालयात वर्षानुवर्षे वाद करीत बसून वेळ, पैसा आणि ताकद खर्च करण्यापेक्षा दोन्ही पक्षांनी सामंजस्याची भूमिका घेऊन लोकन्यायालयात वाद मिटविण्यात यावा असा प्रवाह भारतीय न्यायालयाच्या इतिहासात गेल्या दशकात प्रकर्षाने रुढ झालेला आहे. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि. १३) झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली. एकूण १७ हजार ५१७ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले असल्याची माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येत आहे. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती.

रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एस. सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतमध्ये रायगड जिल्ह्यातील दाखल पूर्व व प्रलंबित अशी एकूण ९५ हजार ८२ प्रकरणे लोकअदालतमध्ये ठेवण्यात आली होती. त्यापैकी दाखलपूर्व १५ हजार ९११ व प्रलंबित प्रकरणांपैकी एक हजार ६०६ प्रकरणे अशी एकूण १७ हजार ५१७ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोकअदालतीमध्ये निकाली निघाली व त्याद्वारे पक्षकारांना एकूण १७ कोटी ६० लाख ५९ हजार १८ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली. दरम्यान, या लोकन्यायालयात पाच जोडप्यांचा पुन्हा संसार जुळला आहे.

जिल्ह्यातील विविध न्यायालयात ४८ लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करूनसुद्धा प्रकरणे मिटविण्यात आली. या लोकन्यायालयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील, जिल्हा परिषद रायगड, पोलीस अधीक्षक रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी चांगला प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एस. सावंत व न्यायाधीश तथा सचिव अमोल अ. शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

### पाच जोडप्यांचा संसार पुन्हा जुळला

अलिबाग येथील लोकन्यायालयात पाच जोडप्यांचा संसार पुन्हा जुळला, ज्यामध्ये ज्येष्ठ नागरिक पती-पत्नी होते. त्यांचा सामंजस्याने वाद मिटल्यामुळे नांदायला गेली. त्या पक्षकारांचा प्रमुख जिल्हा न्यायाधीश एस. एस. सावंत व पॅनलवरील न्यायाधीशांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व भावी आयुष्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

# गाळसुरीत आदिवासी कुटुंबाला मारहाण

## अल्पवयीन मुलाचे अपहरण, दोघांना अटक

**म्हसळा : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील गाळसुरी आदीवासीवाडीमधील नंदू वाघमारे यांच्या कुटुंबातील चौघांना मारहाण आणि अल्पवयीन मुलाचे अपहरण करण्यात आहे. या प्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




याबाबतची माहिती अशी की, गाळसुरी आदिवासी वाडीवरील नंदू वाघमारे, मंगला नंदू वाघमारे, राजश्री गणेश मांडवकर आणि अल्पवयीन मुलगा रुपेश हे चौघे जितेंद्र खोत (रा. नांदगाव, ता. मुरूड) यांच्याकडे वीटभट्टी व अन्य कामासाठी गेल्या १०-१२ वर्षापासून काम करीत होते. मात्र कामाचा योग्य मोबदला मिळत नसल्याने ते पळून आपल्या घरी गाळसुरे येथे आले होते. त्याचा राग येऊन खोत यांनी गाळसुरी येथे जाऊन वाघमारे कुटुंबीयांना मारहाण केली आणि रुपेश (वय ७) या अल्पवयीन मुलाचे अपहरण केले. त्यामुळे भयभीत झालेल्या वाघमारे कुटुंबीयांनी कोळे (ता. म्हसळा) येथील आपल्या नातलगांचा आश्रय घेतला. या घटनेचे वृत्त समजताच म्हसळा पोलिसांनी वाघमारे कुटुंबीयांवर प्राथमिक उपचार करून त्यांना रितसर गुन्हा नोंदविण्यासाठी श्रीवर्धन पोलीस ठाण्यात पाठविले.

या प्रकरणी मंगल नंदू वाघमारे (वय ४०, रा. गाळसुरी, ता. श्रीवर्धन) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन श्रीवर्धन पोलीस ठाण्यात जितू खोत आणि त्यांच्या एका साथीदाराविरोधात भादवी ४५२, ३६३, ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली असून त्यांना मंगळवार (दि.१६)पर्यंत पोलीस कोठडी मिळाली आहे. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक आर. बी. रसेडे करीत आहे.

# आगरी समाज मंडळातर्फे माणगावात विद्यार्थ्यांचा गुणगौरव



(छाया : सलीम शेख)

**माणगाव : प्रतिनिधी**

येथील आगरी समाज शैक्षणिक, सामाजिक विकास मंडळाच्या वतीने माणगाव येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते श्री गणेश आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. इशस्तवन व स्वागतगीत ईशान्वी म्हात्रे हिने सादर केले तर कुमार चिन्मय म्हात्रे याने सुश्राव्य अभंग सादर केला.

मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात सचिव गजानन पाटील यांनी मंडळाच्या कार्याचा आढावा घेतला. शिक्षक गिरिधर कुथे आणि रवींद्र पाटील यांनी आगरी भाषेचे महत्त्व पटवून सांगितले. आगरी माणूस जीवाला जीव देणारा माणुसकी जपणारा आहे, असे सांगून सामाजिक कार्यकर्ते कैलास पिंगळे यांनी आपल्या भाषणातून आगरी समाजाचा इतिहास सांगितला. मंडळाचे अध्यक्ष संजय पाटील यांनी आपल्या मनोगतातून माणगाव, गोरेगाव, निजामपूर, इंदापूर विभागात राहणाऱ्या समाज बांधवांना संघटित करण्याचा संकल्प व्यक्त केला. या वेळी समाजातील गुणवंत विद्यार्थी, तसेच उद्योजक, सरकारी नोकरीत बढती मिळालेले कर्मचारी आणि ज्येष्ठ नागरिक यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा म्हात्रे व सचिन म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमास ज्ञानेश्वर म्हात्रे, अशोक म्हात्रे, शंकर सवादकर, चंद्रकांत ठाकूर, रामभाऊ धुमाळ, प्रकाश पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. मंडळाचे कार्याध्यक्ष सिद्धार्थ म्हात्रे तसेच हनुमान म्हात्रे, राजन पाटील, शशिकांत म्हात्रे, संजय भोईर, शिवाजी म्हात्रे, विद्याधर जोशी, राजेंद्र भगत, मनीष पाटील, नरेश म्हात्रे, सुरेश धुमाळ, वसंत डाके, काशिनाथ गाणेकर, रवींद्र भगत यांच्यासह सर्व सभासदांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. मंडळाच्या उपाध्यक्षा मेघना भगत यांनी आभार मानले.

# कर्जत दहिवलीत डिजिटल व्हॅनचे उद्घाटन



(छाया : विजय मांडे)

### विविध सुविधा

**डिजिटल व्हॅनमध्ये पंधरा संगणक असून, वाय-फायची सुविधा आहे. या संगणकाच्या आधारे विद्यार्थ्यांना शैक्षणिक माहिती, त्या-त्या इयत्तांचा अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांना गुगलच्या सहाय्याने अधिक माहिती उपलब्ध असणार आहे.**

**कर्जत : प्रतिनिधी**

लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या आनंदो प्रकल्प अंतर्गत दहिवली (ता. कर्जत) येथील जनता विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप आणि डिजिटल व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले. या डिजिटल व्हॅनचा उपयोग शैक्षणिक उपक्रम, जादा तासिका, बाल कला महोत्सव आदींसाठी केला जाणार आहे.

मुख्याध्यापक महादेव क्षीरसागर यांनी उपस्थितांचे स्वागत केले. कांचन थोरवे यांनी प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याची माहिती सांगितली. वैशाली नेमाडे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. त्यानंतर लाईट ऑफ लाईफ संस्थेच्या संस्थापक डॉ. विली डॉक्टर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून डिजिटल व्हॅनचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी आनंदो प्रकल्पांतर्गत विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी मनोगते व्यक्त केली.

सूत्रसंचालन वैशाली नेमाडे यांनी केले. नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, नगरसेवक विवेक दांडेकर, शालेय समिती सदस्य कृष्णा लाड, अमोल क्षीरसागर, रमेश दासवानी, मुख्याध्यापिका ज्योती घरत, डॉ. शारदा निवाते, राजश्री केदार, मोहिनी हजारे, प्रिया सोनावळे, शिला रांगणेकर, संगीता चंदने, सुनील शेंडे आदींसह शिक्षक, विद्यार्थी व पालक या वेळी उपस्थित होते. तानाजी खोमणे यांनी आभार मानले.

# मुरूड समुद्रकिनारी स्वच्छता मोहीम



**मुरूड : प्रतिनिधी**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्ताने मुरूड तहसीलदार कार्यालय, पोलीस ठाणे तसेच सर्व शाळा व महाविद्यायांमार्फत येथील समुद्र किनाऱ्यावर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

मुरूडचा समुद्रकिनारा अडीच किलोमीटर लांबीचा असून, हजारो पर्यटक या समुद्र किनाऱ्याला भेट देत असतात. या ठिकाणी कायम वर्दळ असल्याने कचराही होत असतो. हा समुद्र किनारा स्वच्छ करण्यावर भर दिला जात आहे.

मुरूडचे तहसीलदार रोहन शिंदे, पोलीस निरीक्षक नितिन गवारे, नायब तहसीलदार अमित पुरी, डॉ. श्रीशैल बहिरगुंडे, डॉ. मधुकर वेदपाठक, डॉ. जनार्दन कांबळे, माजी नगरसेवक पाडुरंग आरेकर, सुग्रीव वाघ, पोलीस नाईक परेश म्हात्रे, रितेश यादव, डॉ. विश्वास चव्हाण, सागर रसाळ, वैभव साळुंखे यांच्यासह शाळा, महाविद्यालयांचे विद्यार्थी या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. या सर्वांनी गोळा केलेला कचरा एकत्र करून तेलवडे येथील डम्पिंग ग्राऊंडवर त्याची योग्य ती विल्हेवाट करण्यात आली.



(छाया : संजय करडे)



# रोह्यातील शिबिरात ५० जणांचे रक्तदान

**रोहे : प्रतिनिधी**

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त रोहा लायन्स क्लबने शासकीय विश्रामगृहात आयोजित केलेल्या शिबिरात ५०जणांनी रक्तदान केले.

अलिबाग येथील शासकीय रक्तपेढीचे डॉ. दीपक गोसावी व त्यांच्या सहकाऱ्यांनी या शिबिरात रक्त संकलनाचे काम पाहिले. तहसीलदार कविता जाधव, नायब तहसीलदार राजेश थोरे, रोटरी क्लबचे सुरेंद्र निंबाळकर, स्वप्नील धनावडे, सतीश महाडिक, विक्रम जैन, सृष्टी फाउंडेशनचे सुखद राणे, समिधा अष्टीवकर आदींनी या रक्तदान शिबिराला सदिच्छा भेट दिली.

लायन्स क्लबचे अध्यक्ष अब्बास रोहावाला, उपाध्यक्ष सुश्मिता शिट्याळकर, सेक्रेटरी डॉ. कृष्णा जरग, खजिनदार पराग फुकणे, जयदेव पवार, भावेश दामाणी, नुरूद्दीन रोहावाला, भाऊसाहेब माने, प्रमोद जैन, सैफी रोहावाला, डॉ. तुषार राजपूत, अलेफिया रोहावाला, माया शहा, अनघा माने, जुमाना रोहावाला, बिना दामाणी आदींनी हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# दिवा-सावंतवाडी गाडीला नागोठण्यात थांबा द्यावा

## प्रवासी संघटनेचे विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना निवेदन



(छाया : राज वैशंपायन)

**नागोठणे : प्रतिनिधी**

दिवा-सावंतवाडी (१०१०५) व सावंतवाडी-दिवा (१०१०६) या रेल्वे गाड्यांना नागोठण्यात थांबा मिळावा, अशी मागणी प्रवासी संघटनेने येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिवा-सावंतवाडी व सावंतवाडी-दिवा या दोन्ही गाड्या पूर्वी पेण, नागोठणे, रोहा या स्थानकात थांबत होत्या. मात्र कोविड लॉकडाऊनदरम्यान हे थांबे बंद झाले. जनजीवन पूर्वपदावर आल्यानंतर सावंतवाडी-दिवा ही गाडी सुरु करण्यात आली. ही गाडी पनवेल, आपटा व जिते येथे थांबा घेते त्यानंतर थेट माणगाव व पुढील सर्व थांबे घेते. पेण, नागोठणे व रोहा स्थानकातून मुंबईला रोज ये-जा करणाऱ्या प्रवासी, कर्मचारी, अधिकारी व विद्यार्थ्यांची संख्या फार मोठी आहे. मात्र दिवा-सावंतवाडी व सावंतवाडी-दिवा या गाड्यांना नागोठण्याला थांबा नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत आहे. त्यामुळे दिवा-रत्नागिरी गाडीप्रमाणेच दिवा-सावंतवाडी गाडीला पूर्वीच्या वेळेप्रमाणे सर्व ठिकाणी थांबे द्यावेत असे नागोठणे येथील विभागीय रेल्वे व्यवस्थापकांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. प्रवासी संघटनेने या निवेदनाच्या प्रती नागोठणे, पेण व रोहा येथील स्टेशन प्रबंधकांनाही दिल्या आहेत.

## कोलाडच्या धर्माधिकारी महाविद्यालयात स्वातंत्र्यसैनिकांचे व्याख्यान

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोलाड येथील डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात स्वातंत्र्यसैनिक वसंत रामचंद्र धामणे व केवळ लिंबाजी झावरे यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

स्वातंत्र्यसैनिक वसंत रामचंद्र धामणे (रा. कांडणे बुद्रुक, ता. रोहा) यांनी ३८ वर्षे देशसेवा केली आहे. तर केवळ लिंबाजी झावरे हे सध्या आसाम येथे कम्युनिकेशन ऑपरेटर म्हणून सैन्यदलात कार्यरत आहेत. त्या दोघांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर शिवाजी मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात अनुभव कथन केले. तसेच देशसेवा ही ईश्वर सेवा असते. मातृभूमीच्या रक्षणासाठी तरुणांनी पुढे आले पाहिजे, असे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयवंती अडलीकर यांनी केले. प्रा. नेहल प्रधान, प्रा. रेश्मा शेळके, प्रा. सूर्यकांत आमलपुरे, प्रा. अनिरुद्ध मोरे, प्रा. प्रतीक्षा सिंह यांच्यासह प्राध्यापकेतर कर्मचारी व विद्यार्थी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रा. सतीश सावळे यांनी आभार मानले.



(छाया : महादेव सरसंबे)

# विद्यार्थ्यांची अमृत महोत्सवी मानवंदना




**कर्जत : शारदा मंदिरच्या २०२ विद्यार्थ्यांनी ७५ अंकाच्या कृतीत उभे राहून शनिवारी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. शाळेच्या मुख्याध्यापिका अंजली किसवे, छाया नगरकर यांच्या नेतृत्त्वाखाली विजय सावंत व धनश्री कानडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.** (छाया : विजय मांडे)

# कर्जतमध्ये कराओके गायन स्पर्धा रंगली

**कर्जत : प्रतिनिधी**

भाजप नेते सुनील गोगटे यांच्या कर्जत विठ्ठलनगर येथील निवासस्थानी संस्कार भारतीच्या वतीने कराओके गायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

संस्कार भारतीचे उत्तर रायगड अध्यक्ष पांडुरंग गरवारे, प्रमुख पाहुणे संदीप पाटील, सुनील गोगटे, माजी पदाधिकारी उर्मिला जोशी, स्पर्धेचे परीक्षक संतोष माडगूळकर व स्नेहा गोगटे यांच्या हस्ते नटराज पूजन व दीपप्रज्वलन झाले. त्यानंतर सुरेखा शितोळे, दिनिती सावंत, सायली कुंभार, ज्योती कडू, स्वप्ना सोहोनी व प्राजक्ता गरवारे यांनी ध्येयगीत सादर केले. संस्थेचे माजी पदाधिकारी व नाट्य कलावंत प्रकाश चौथाई व नाट्यकर्मी प्रदीप पटवर्धन यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

या कराओके गायन स्पर्धेत एकूण २२ जणांनी मराठी व हिंदी गाणी सादर केली. या स्पर्धेत नम्रता देवरे यांनी प्रथम, प्राची साळोखे यांनी द्वितीय व ऋतिका पाठारे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. विवेक पांचाळ, भाविका उतेकर व मानस भोपतराव यांना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली. संस्कार भारतीच्या आजी व माजी सभासदांसह संगीतप्रेमी या स्पर्धेला उपस्थित होते. संस्कार भारतीच्या कर्जत अध्यक्ष भारती म्हसे यांनी आभार मानले. स्वातंत्र्य दिनी (दि. १५) होणाऱ्या वंदे मातरम् गौरवगान या कार्यक्रमात स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहेत.

नव्या दिशाने,
नव्या विचाराने,
पाऊल तुमचे
पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या
तेजस ज्योतीने,
तुमचे प्रगतीपथ
प्रकाशमान व्हावे..!

पेण विधानसभा मतदारसंघाचे
मा. श्री. आमदार रवीशेठ पाटील
यांना
वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा!

भाजपा

सौजन्य : मिलिंद पाटील, सरचिटणीस, दक्षिण रायगड जिल्हा भाजपा

---

स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

माझे कुटुंब, माझी जबाबदारी! आरोग्य सेवा आपल्या दारी...

स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत जांभिवली (ता. पनवेल)

सौ. रिया रविंद्र कोंडिलकर (सरपंच) श्री. मनोहर रा. कोंडिलकर (उपसरपंच)
सौ. अर्चना संतोष देशमुख (ग्रामसेवक)

श्री. हरिश्चंद्र दामू वाघ (सदस्य)
सौ. अनिता अनंता कोंडिलकर (सदस्या)
सौ. जानवी जयंता कोंडिलकर (सदस्या)
श्री. अमित गोविंद कोंडिलकर (सदस्य)
सौ. मनी गोपाळ कातकरी (पवार) (सदस्या)
श्री. शेखर धर्मराज जाधव (सदस्य)
सौ. वेदिका विनोद जाईलकर (सदस्या)
सौ. मनिषा नारायण साळवी (सदस्या)

स्वच्छता म्हणजे रोजचाच सण, नाहीतर कायमचे आजारपण!

---

सुरक्षित अंतर ठेवू या, कोरोनाला हरवू या!

माझे कुटुंब, माझी जबाबदारी! आरोग्य सेवा आपल्या दारी...

स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...

स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत कराडे खुर्द (ता. पनवेल)

सौ. भारती हेमंत चितळे (सरपंच) सौ. नलिनी नथुराम कारंदे (उपसरपंच)
श्री. निवृत्ती आंधळे (ग्रामविकास अधिकारी)

श्री. मुकेश परशुराम पाटील (सदस्य) सौ. प्रमिला योगेश पाटील (सदस्या)
सौ. मीनल धनाजी ठोंबरे (सदस्या) सौ. रेवती रवींद्र भोईर (सदस्या)
सौ. यशश्री योगेश मुरकुटे (सदस्या) सौ. माधुरी प्रशांत चितळे (सदस्या)
श्री संतोष दत्तात्रेय म्हात्रे (सदस्य) श्री. नितेश नाथा कारंदे (सदस्य)
सर्व कर्मचारी वर्ग

झाडे लावा, झाडे जगवा..!

---

माझे कुटुंब, माझी जबाबदारी! आरोग्य सेवा आपल्या दारी...

स्वच्छता म्हणजे रोजचाच सण, नाहीतर कायमचे आजारपण!

स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

रेश्मा वाजेकर, उपसरपंच
सौ. साधना कातकरी, सरपंच

संगिता चौधरी, निकिता चौधरी, सोनाली घरत, सुवाबाई माळी, सानिका कातकरी, अविनाश वाकडीकर, भाऊ वाजेकर, प्रमोद कर्णेकर, विजय भोपी, गजानन घरत

शुभेच्छुक : शिरढोण ग्रामपंचायत, ता. पनवेल

---

सुरक्षित अंतर ठेवू या, कोरोनाला हरवू या!

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

झाडे लावा, झाडे जगवा..!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे ता. पनवेल, रायगड

सौ. अनुराधा विष्णु वाघमारे (सरपंच) सौ. निराबाई शांताराम चौधरी (उपसरपंच)
श्री. एम. डी. पाटील (ग्रामविकास अधिकारी)

श्री. रमेश सिताराम पाटील (सदस्य) श्री. दिलीप अनंता उलवेकर (सदस्य)
सौ. दर्शना नारायण चौधरी (सदस्या) सौ. संगिता गुरुनाथ उसाटकर (सदस्या)
श्री. किशोर आत्माराम पाटील (सदस्य) सौ. कलावती गणेश पाटील (सदस्या)
सौ. मंगल गणेश उसाटकर (सदस्या) सौ. गंगाबाई बाळाराम पाटील (सदस्या)
श्री. भरत सुभाष भोपी (सदस्य) श्री. बेंडू लक्ष्मण कातकरी (सदस्य)

---

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सर्व नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

सुरक्षित अंतर ठेवू या, कोरोनाला हरवू या!

शुभेच्छुक

# ग्रामपंचायत गव्हाण

सौ. माई प्रकाश भोईर (सरपंच) श्री. विजय हिरा घरत (उपसरपंच) श्री. विजय राठोड (ग्रामविकास अधिकारी)

श्री. सचिन रघुनाथ घरत (सदस्य)
श्री. हेमंत कृष्णा पाटील (सदस्य)
श्री. रोशन हिरालाल म्हात्रे (सदस्य)
श्री. अरुण मधुकर कोळी (सदस्य)
श्री. पंकज पंढरीनाथ पाटील (सदस्य)
सौ. योगिता सुहास भगत (सदस्या)
सौ. शिल्पा किरण कडू (सदस्या)
सौ. उषा महेंद्र देशमुख (सदस्या)
सौ. सुनिता गजानन घरत (सदस्या)
सौ. कामिनी प्रमोद कोळी (सदस्या)
श्रीमती गिरिजाबाई जनार्दन कातकरी (सदस्या)

सुरक्षित अंतर ठेवू या, कोरोनाला हरवू या! झाडे लावा, झाडे जगवा..!

---

सुरक्षित अंतर ठेवू या, कोरोनाला हरवू या!

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व नागरिकांना मन:पूर्वक शुभेच्छा!

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत खानावले

सरपंच सौ. जयश्री सुभाष नाईक
उपसरपंच श्री. मोहन बाळाराम लबडे

ग्रामसेवक
श्री. रमेश नामदेव तारेकर

श्री. जगदीश सदानंद पाटील (सदस्य) सौ. रविना बाळाराम पाटील (सदस्या)
श्री. गणेश सुनील कातकरी (सदस्य) सौ. प्रतिक्षा रघुनाथ सोनावळे (सदस्या)
सौ. किर्ती संतोष लबडे (सदस्या) सौ. वनिता महेंद्र पाटील (सदस्या)
सौ. वैशाली गणेश आगिवले (सदस्या)

हनुमंत वाघू लबडे (लेखनिक), सुभाष शंकर नाईक (शिपाई), भास्कर दत्तात्रेय दिसले (दिवाबत्ती कर्मचारी), भारती गणेश पाटील (लेखनिक), केशव धोंडू कातकरी (सफाई कामगार), दिनेश बाळाराम पाटील (घंटागाडी चालक)

---

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

"स्वच्छ सुंदर ग्रामपंचायत व्हावे"

माझे कुटुंब, माझी जबाबदारी! आरोग्य सेवा आपल्या दारी...

स्वातंत्र्य दिन चिरायू होवो...

सर्व नागरिकांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

श्री. हरिश्चंद्र म्हात्रे, सरपंच
सौ. मंजुषा ठाकूर, उपसरपंच

श्री. किसन पाटील, श्री. सामरशेठ ठाकूर, श्री. प्रल्हाद पाटील, श्री. देवेंद्र भोईर, श्री. एन. आर. शेडगे, सौ. साधना तांडेल, सौ. निर्मला ठाकूर, सौ. कल्पना घरत, सौ. अमृता पाटील, सौ. विजया ठाकूर

झाडे लावा, झाडे जगवा..!

शुभेच्छुक : ग्रामपंचायत न्हावे, ता. पनवेल

---

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे

माझे कुटुंब, माझी जबाबदारी! आरोग्य सेवा आपल्या दारी...

स्वच्छता म्हणजे रोजचाच सण, नाहीतर कायमचे आजारपण!

स्वातंत्र्य दिनाच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!

शुभेच्छुक

# ग्रुप ग्रामपंचायत कोन (ता. पनवेल)

श्री. दीपक धाया म्हात्रे (सरपंच) सौ. शशिकला नारायण घरत (उपसरपंच)
श्री. रमेश तारेकर (ग्रामविकास अधिकारी)

श्री. घनश्याम महादेव पाटील (सदस्य) श्री. महेश जोमा माळी (सदस्य)
सौ. सुलोचना ज्ञानेश्वर भागीत (सदस्या) सौ. अनुष्का अशोक म्हात्रे (सदस्या)
सौ. ताईबाई बाळकृष्ण पाटील (सदस्या) श्री. जगन्नाथ सारडेकर (सदस्य)
सौ. दिपीका दीपक कांबळे (सदस्या) सौ. आशा अशोक घरत (सदस्या)
श्री. जितेश बाळाराम शिसवे (सदस्य)

झाडे लावा, झाडे जगवा..!